**प्रतिवादी तर्फे उर्वरीत उलटतपास – श्री. एम. जी. बडदारे वकील.**

१. मी दावा मिळकतीची खरेदी करण्यापूर्वी ती जमीन कोठून व कशी आली याबाबत माहिती घेतली नव्हती. मला प्रतिवादी सोबत पहिली बैठक कोणत्या तारखेला व कोठे झाली होती याबाबत सांगता येणार नाही. त्या बैठकीला आम्ही सर्व मिळून चार ते पाच लोक होतो. मी प्रतिवादीकडे जमिनीच्या कागदपत्रांची मागणी केली होती.

२. माझी व प्रतिवादीची दावा मिळकतीची किंमत ठरवण्यासाठी एकच बैठक झाली होती. आमची बैठक झाली त्याच दिवशी करार करायचे ठरले होते. सदर बैठक प्रतिवादीच्या शेताशेजारील केशव कोंडूसकरांच्या खेडे गावातील घरात साधारणतः सकाळी ११.०० ते १२.०० वाजेच्या दरम्यान झाली होती. त्या बैठकीला केशव हजर होता.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी पैशांची अडचण असल्यामुळे प्रतिवादी १०,०००/– रुपये स्विकारुन करारनामा करुन देण्यास तयार झाल्याचे खोटे सांगत आहे. मला पहिल्या बैठकीमध्येच किंमत ठरवून प्रतिवादीला किती पैसे द्यावे लागतील याची माहिती नव्हती. मी करारनामा केल्या दिवशी बांधकामासाठी घरी ठेवलेले पैसे आणून प्रतिवादीला दिले होते.

प्रश्न – तुम्ही सदर रक्कम बैठक झालेल्या ठिकाणी प्रतिवादीला दिली होती काय

उत्तर – मी सदर रक्कम रविंद्र कवळेकर याच्या हॉटेलमध्ये प्रतिवादीला दिली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी पैसे घेऊन येईपर्यंत प्रतिवादी त्याच्या घरी थांबला होता. मी प्रतिवादीला पैसे दिल्याची लेखी पावती जागेवरती केली नव्हती. मला त्याबाबतची पावती करण्यास अडचण नव्हती. मी प्रतिवादीला पैसे दिले तेव्हा तो, मी व हॉटेल मालक रविंद्र असे तिघे हजर होतो.

५. आम्ही वादातील करारनामा शिवाजीनगर, आजरा येथील दिगंबर पांडुरंग सावंत यांच्या घरात लिहिला होता. आम्हाला हॉटेल मधून आजरा येथे येण्यास तास ते दिड तास लागला होता. मी करारनाम्यापूर्वी सावंत यांच्याकडे कधीही गेलो नव्हतो. आम्ही गेलो तेव्हा सावंत घरी होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सावंत यांना करारनाम्याची

माहिती सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, सावंत यांना करारनाम्याचे कच्चे टिपण करण्यास तास ते दिड तासाचा वेळ लागला होता. साक्षीदार स्वतःहून सांगतो, प्रतिवादीने सांगितलेल्या माहिती प्रमाणे सावंत यांनी पक्का करारनामा लिहिला होता.

६. करारनामा केल्यानंतर त्यावरती प्रतिवादीने अगोदर निशाणी अंगठा केला होता, त्यानंतर मी स्वाक्षरी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्याप्रमाणे सावंत यांच्याकडे कोणताही करारनामा करुन घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर करारनाम्यावरती प्रतिवादीने स्वाक्षरी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला रविंद कवळेकरच्या हॉटेलमध्ये १०,०००/– रुपये दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा करारनामा तयार करुन त्याबाबतचा खोटा दावा दाखल केला आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला दि.०८.०५.१९९५ रोजी घरातून १०,०००/– रुपये आणून दिल्याचे खोटे सांगत आहे. करारनाम्या नंतर आम्ही आपापल्या कामासाठी निघून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी रविंद्र कवळेकर समक्ष प्रतिवादी सोबत करारनामा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम देण्यापासून ते करारनामा करेपर्यंत केवळ मी व प्रतिवादी असे दोघेच होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या मधील व्यवहारास कोणीही साक्षीदार नव्हते.

८. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्याच्या अनुषंगाने प्रतिवादीला आणखीन रक्कम दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२१.०३.२०१६ रोजी प्रतिवादीला पाठवलेली नोटीस मिळाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने कधीही दावा मिळकत माझ्या ताब्यात दिलेली नाही. मी दावा मिळकतीचा ताबा घेतल्याबाबतची स्वतंत्र लेखी कब्जेपट्टी तयार करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आज देखील दावा मिळकत कसत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीने चित्री प्रकल्पासाठीचा राखीव जमिनीचा शेरा कमी करुन आणण्याचे आश्वासन दिल्याचे खोटे सांगत आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या मुलांनी दि.०१.०६.२०१६ रोजी माझ्या ताब्यास अडथळा केल्यामुळे मला तो करारनाम्याची पुर्तता करुन देणार नसल्याची समज झाल्याचे खोटे सांगत आहे. प्रतिवादीने मला दि.१०.०६.२०१६ पुर्वी कधीही विक्रीपत्र करुन न देण्याची, रक्कम परत देऊन जमीन मागितल्याची अथवा वहिवाटीस अडथळा करण्याची धमकी दिलेली नाही.

१०. मी प्रतिवादी सोबत केलेल्या करारनाम्याचा मूळ दस्त न्यायालयात सादर केलेला नाही. मला न्यायालयीन कामाचा अनुभव नसल्यामुळे मी गहाळ झालेला करारनाम्याचा मूळ दस्त आणल्या दिवशी सकाळी न्यायालयात दाखल करु शकलो नाही. रविंद्र कवळेकर चे शपथपत्र करण्यासाठी करारनाम्याच्या मूळ दस्ताची कोणतीही आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नाझरांना रविंद्रचे शपथपत्र करण्यासाठी करारनाम्याच्या मूळ दस्ताची आवश्यकता नव्हती. नाझरांनी कवळेकरांचे शपथपत्र आम्ही दिल्याप्रमाणे केले होते.

११. मला करारनामा झेरॉक्स करण्यासाठी कोणाच्या दुकानात घेऊन गेलो होतो त्याचे नाव सांगता येणार नाही. मी झेरॉक्सचे पैसे दिल्या बाबतची पावती घेतली नव्हती. मी दस्त गहाळ झाल्यानंतर देखील झेरॉक्स दुकानदाराकडे त्याच्या नावाची व गावाची चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेला करारनामा अस्तीत्वात नसल्यामुळे तो झेरॉक्स काढल्यानंतर हरवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी करारनाम्याच्या झेरॉक्स काढल्याचे खोटे सांगत आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीने स्टँप खरेदी केल्याच्या नोंदवहीची नक्कल हजर केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.०८.०५.१९९५ रोजी करारनामा केल्यानंतर त्याची झेरॉक्स काढल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हरवलेला करारनामा सावंत यांनी प्रतिवादीच्या सांगण्या प्रमाणे लिहिल्यानंतर साक्षीदारां समोर वाचून दाखवल्यावर, प्रतिवादीने मान्य करुन त्यावरती निशाणी अंगठा केल्याचे व त्याला सावंत यांनी दस्तूर बांधल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या करारनाम्या वरती इंग्रजीत स्वाक्षरी केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही

की, माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.१० मधील मजकूर खोटा आहे.

**१३**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला दावा मिळकतीची विक्री करण्याचे कोणतेही कारण नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादीने बैठक घेऊन जमीन खरेदीची रक्कम ठरवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विरोधात या न्यायालयात नि. दि. दा. क्र.६९/२०२० प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे करारनामे करुन लोकांना त्रास देण्याचा माझा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १८.०३.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.